# प्रशासकीय कामांचा निपटारा जबाबदारीने व्हावा

## – डॉ. विलास नांदवडेकर

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

प्रशासनामधील प्रचलित कार्यप्रणालीच्या माध्यमातून कामांचा निपटारा सहज, सुलभतेने व जबाबदारपूर्वक व्हावा. प्रत्येक कर्मचाऱ्याने या उद्देशासाठी योगदान देणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी केले. शिवाजी विद्यापीठाच्या एमबीए अधिविभागातर्फे 'ॲकॅडमी ऑफ ॲकॅडेमिक ॲडमिनिस्ट्रेटर्स' या विषयावरील एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. ॲकॅडमी ऑफ ॲकॅडेमिक ॲडमिनिस्ट्रेशन, मुंबई अंतर्गत आयोजित या पहिल्या कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी अध्यक्षपदावरून कुलसचिव बोलत होते. सोलापूर विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. गणेश मांझा हे प्रमुख उपस्थित होते.

कुलसचिव डॉ. नांदवडेकर म्हणाले, विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या संकल्पनेतून प्रशासकीय सेवक, अधिकाऱ्यांना प्रशासकीय कामकाजाच्या अद्ययावत पद्धतीची माहिती करवून देण्यासाठी ही अकादमी स्थापन झालेली आहे. भविष्यात राज्य व राष्ट्रीय पातळीवरील सर्व स्तरांवरील प्रशासकीय सेवक, अधिकाऱ्यांसाठी एक ते चार दिवसांच्या अशा पद्धतीच्या मार्गदर्शनपर कार्यशाळांचे आयोजन करण्याचा विद्यापीठाचा मानस आहे. यामुळे वेगवेगळ्या आस्थापनांवरील प्रशिक्षित सेवक, अधिकाऱ्यांकडून नागरिकांच्या प्रश्नांची सोडवणूक करणे सुलभ होईल. कार्यालयीन कामकाजामध्ये महाराष्ट्र पब्लिक युनिव्हर्सिटी ॲक्ट, २०१६ अन्वये घ्यावयाच्या निर्णयाची सुरुवात अधीक्षक पातळीपासून होते. त्यामुळे पूर्ण क्षमतेने व जबाबदारीने विविध विषयांवरील टिप्पणींचे सादरीकरण संबंधित विषयाच्या अनुषंगिक संपूर्ण माहितीसह होणे आवश्यक आहे. अधिकार मंडळाने वेळोवेळी घेतलेल्या निर्णयांची अंमलबजावणी होण्यासाठी अधीक्षकांनी सदैव दक्ष राहिले पाहिजे. कामकाजात गती येण्यासाठी कार्यालयामधील निरोगी वातावरणाची निर्मिती सुसंवादाने होईल. प्रत्येकास संगणकाचे अद्ययावत ज्ञान असणे आवश्यक आहे. विद्यापीठाने कार्यान्वित केलेल्या मीटिंग सॉफ्टवेअरची मागणी अनेक पातळीवरून होत आहे. कामकाजामध्ये विद्यार्थिकेंद्रित हिताची जपणूक प्राधान्याने केली पाहिजे.

एमबीए अधिविभागप्रमुख डॉ. एच. एम. ठकार यांनी प्रास्ताविक केले. विद्यापीठाचे अंतर्गत लेखापाल अजित चौगुले यांच्यासह विद्यापीठातील अधीक्षक, सहायक अधीक्षक उपस्थित होते.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या एमबीए अधिविभागातर्फे 'ॲकॅडमी ऑफ ॲकॅडेमिक ॲडमिनिस्ट्रेटर्स' या विषयावरील एकदिवसीय कार्यशाळेमध्ये बोलताना कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर.**

# भारतीय विद्यार्थ्यांना जपानमध्ये संधी

## – डॉ. जयदीप बागी

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**
शिवाजी विद्यापीठाचे जपानच्या केयी युनिव्हर्सिटीशी चांगले संबंध आहेत, तसेच दरवर्षी जपानला इंजिनिअर्सची आवश्यकता असते. त्यामुळे भारतीय इंजिनिअर्सना जपानमध्ये चांगल्या संधी आहेत, असे प्रतिपादन डॉ. जयदीप बागी यांनी केले. शिवाजी विद्यापीठ तंत्रज्ञान अधिविभागात जपानच्या केयी युनिव्हर्सिटीच्या डिपार्टमेंट ऑफ इलेक्ट्रॉनिक्स अँड इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंगचे प्रोफेसर डॉ. केयी नोडा यांनी भेट दिली, त्यावेळी ते बोलत होते.



**कोल्हापूर : विद्यापीठ तंत्रज्ञान अधिविभागात जपानच्या केयी युनिव्हर्सिटीच्या डिपार्टमेंट ऑफ इलेक्ट्रॉनिक्स अँड इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंगचे प्रोफेसर डॉ. केयी नोडा यांनी भेट दिली, त्याप्रसंगी डॉ. जयदीप बागी.**

डॉ. बागी म्हणाले, भारतीय उद्योग व अर्थव्यवस्थेच्या विकासामध्ये इलेक्ट्रॉनिक सिस्टीम डिझाईन अँड मॅन्युफॅक्चरिंग या प्रणालीचा उपयोग असून, याचा औद्योगिक क्षेत्र वाढीस मोठा सहभाग आहे. सोनी, टोयोटा, होंडा या जापनीज कंपन्यांची भारतात उत्पादन सुविधा आहे. तसेच ऑटोमोबाईल क्षेत्रामधील बहुराष्ट्रीय मारुती सुझुकी ही भारत व जपान यांची भागीदारी कंपनी असून, भारतात व जपानमध्ये भारतीय अभियंत्यांना शिक्षणाची व कामाची संधी निर्माण करत आहे.

यावेळी प्रोफेसर डॉ. केयी नोडा यांनी 'सेमी कंडक्टर फिल्म प्रीपरेशन बाय सोल्युशन बेस्ड प्रोसेस टूवर्डस् इलेक्ट्रॉनिक डिव्हायसेस ॲप्लिकेशन अँड फोटो एनर्जी' विषयावरील माहिती दिली. त्यांनी या संशोधनाबद्दल सविस्तर माहिती तसेच जापनीज शिक्षणप्रणाली व औद्योगिक प्रगती याचेही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले, तर ट्रेनिंग आणि प्लेसमेंट समन्वयक डॉ. एस. बी. सादळे यांनी दिली.

इलेक्ट्रॉनिक्स उद्योगामध्ये भारत सरकार विविध धोरणे, प्रोत्साहने आणि आंतरराष्ट्रीय गुंतवणुकीद्वारे मदत देत असल्याची माहिती दिली. कार्यक्रमास शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांचेही मार्गदर्शन तसेच प्र. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के आणि कुलसचिव डॉ. व्ही. डी. नांदवडेकर यांचे प्रोत्साहन लाभले.

विद्यार्थ्यांना परदेशी उच्च शिक्षण व रोजगार यासाठी 'इंटरनॅशनल सेल' कार्यरत आहे, त्याचा लाभ विद्यार्थ्यांनी घ्यावा, असे प्रतिपादन या सेलचे को-ऑर्डिनेटर प्रा. उदय पाटील यांनी केले. या वेळी अधिविभागातील प्राध्यापक व विद्यार्थी उपस्थित होते.

# इको रेंजर पर्यावरण संरक्षणासाठी दोनशे विद्यार्थ्यांचा सहभाग

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

किर्लोस्कर वसुंधरा आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवांतर्गत शहरातील १० महाविद्यालयातील दोनशे विद्यार्थ्यांचा व शिक्षकांचा त्यांच्या संवादातून इको रेंजर समूह कार्यरत झाला आहे.

पर्यावरण संरक्षण आणि त्या अनुषंगाने जाणीव जागृती परिसरात आणि जिल्ह्यातील विविध भागात व्हावा यादृष्टीने एक महाविद्यालयातील २० विद्यार्थी आणि विद्यार्थिनींचा हवा असलेला दोनशे विद्यार्थ्यांचा समूह इको रेंजर या नावाने आजपासून कार्यरत झाला. यामध्ये भाऊ इन्स्टिट्यूट, सायबर, राजाराम कॉलेज, आयटी कॉलेज, न्यू आरती केचार, डी. वाय. पाटील इंजिनिअरिंग, महावीर कॉलेज, गोखले कॉलेज, दळवीज् आर्ट स्कूल, शहाजी कॉलेज, टेक्नॉलॉजी डिपार्टमेंट शिवाजी विद्यापीठातील विद्यार्थ्यांचा सहभाग आहे.

या उपक्रमाची सुरुवात किर्लोस्कर उद्योग समूहाचे प्रमुख सी. जी. रानडे असोसिएट व्हाईस प्रेसिडेंट ४ कृष्णा गावडे, प्राध्यापक शर्मा, आयोजक विदेव चित्रा, अनिल चौगुले, राहुल पवार, उदय गायकवाड यांच्या उपस्थितीत झाला. पाणी, जमीन, वायू, जंगल परिस्थितीची पर्यावरण जैवविविधता अशा विषयांतर्गत अनेक उपक्रम वर्षभर विविध ठिकाणी राबवण्यात येणार आहेत.

1 2 SEP 2018
Times of India

# SUK invites nominations for Kanbarkar annual award

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur:** The Shivaji University, Kolhapur (SUK) has invited nominations for the Principal RK Kanbarkar Award by September 30. In a circular on August 31, it said that nominations are to be made by a person not below the rank of vice-chancellor or equivalent.

The circular said, "The said award shall be given to a worthy person or a duly registered organisation from any part of India for outstanding contributions to or achievements in the field of Education, Literature, Social Work and Cultural Activities, Sports or such other area as may be deemed fit by search cum selection committee. The award shall be given without any consideration of religion, region, caste, creed language and gender."

The award is conferred on April 13 every year on the birth anniversary of RK Kanbarkar. It comes with a cash amount of Rs 1.51 lakh, memento, and shawl. A university official said the university appoints a five-member search committee for the fair selection of the candidate. The committee is headed by the vice-chancellor himself.

**Kanbarkar, an octogenarian social activist, was vice chancellor of Shivaji University, Kolhapur from 1980 to 1983**

The award, which started from last year, is conferred on an annual basis. The Kanbarkar family has handed over a cheque of Rs 25 lakh to the university in the year 2015. The first-ever Principal RK Kanbarkar Award was conferred to eminent scientist Bharat Ratna CNR Rao in the month of April 2016; the second was presented to the Satara-based Rayat Shikshan Sanstha in 2017. Earlier this year it was awarded to eminent director Jabbar Patel.

Kanbarkar, an octogenarian social activist, was vice chancellor of Shivaji University, Kolhapur from 1980 to 1983. He was the frontline leader of several progressive movements in the city.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
12 SEP 2018
तरुण भारत

# 'मुद्रितशोधन प्रमाणपत्र अभ्यासक्रम' प्रवेश प्रक्रिया सुरू

**कोल्हापूर :** बिंदू चौक येथील नाईट कॉलेजमध्ये मराठी विभागाच्या वतीने शिवाजी विद्यापीठ मान्यताप्राप्त 'मुद्रितशोधन प्रमाणपत्र अभ्यासक्रम' प्रवेश प्रक्रिया सुरू झाली आहे. १० सप्टेंबरपासून या अभ्यासक्रमाला सुरुवात होणार आहे. नाईट कॉलेजमध्ये १० सप्टेंबर ते १० ऑक्टोबर या एक महिना कालावधीत सायं. ६ ते ८ या वेळेत हा अभ्यासक्रम सुरू राहील. यामध्ये मुद्रितशोधन संकल्पना, स्वरूप, मराठी लेखनविषयक नियम, व्याकरण, विरामचिन्हे याविषयी मार्गदर्शन केले जाणार आहे. तरी इच्छुकांनी मराठी विभागप्रमुख डॉ. अरुण शिंदे यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
12 SEP 2018
तरुण भारत

# 'मोडी लिपी अभ्यासक्रम' प्रवेश प्रक्रिया सुरू

कोल्हापूर : बिंदू चौक येथील नाईट कॉलेजमध्ये शिवाजी विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन व विस्तार विभागातर्फे 'मोडीलिपी प्रमाणपत्र अभ्यासक्रम' प्रवेश प्रक्रिया सुरू झाली आहे. नाईट कॉलेजमध्ये १० सप्टेंबर ते १० ऑक्टोबर या एक महिना कालावधीत सायं. ६ ते ८ या वेळेत हा अभ्यासक्रम सुरू राहिल. तरी इच्छुक विद्यार्थ्यांनी मराठी विभागप्रमुख डॉ. अरूण शिंदे यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
12 SEP 2018
महाराष्ट्र टाईम्स

# 'कला, क्रीडा क्षेत्रात विवेकानंद अग्रगण्य'

**कोल्हापूरः** शिवाजी विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रामध्ये सर्वाधिक शिष्यवृत्ती मिळवणारे विवेकानंद कॉलेज हे एकमेव कॉलेज आहे. विवेकानंद कॉलेजचा विद्यार्थी हा कला, क्रीडा क्षेत्रातही अग्रगण्य असल्याचे प्रतिपादन कॉलेजचे प्राचार्य एस.वाय.होनगेकर यांनी व्यक्त केले. शास्त्रशाखेतील बीएस्सीच्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. डॉ. किरण शिंदे यांनी प्रास्ताविक केले. प्रा. एस. ए. पाटील यांनी आभार मानले. पदार्थविज्ञान विभागप्रमुख डॉ. एम. एम. कारंजकर यांनी आभार मानले.